● गुरुवार, दि. २० फेब्रुवारी २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक २०२ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

### मराठा क्रांती मोर्चा शिवजन्मोत्सव कुस्ती स्पर्धा!

## कोल्हापूरचा राघू ठोंबरे विजेता रोहिलागडचा जगदीश राजपूत उपविजेता



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त मराठा क्रांती मोर्चा प्रणित शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने घेण्यात आलेल्या कुस्ती स्पर्धेत अत्यंत चुरशीच्या लढाईत कोल्हापूर येथील शाहूपुरी आखाड्याचा पै. राघू ठोंबरे हा विजेता तर रोहिलागड येथील पैलवान जगदीश राजपूत उपविजेता ठरला.

मंगळवारी ( ता. १८) जालना शहरातील स्व. कल्याणराव घोगरे क्रीडा संकुलात प्रथमच कुस्त्यांची दंगल भरविण्यात आली. यात मराठवाड्यासह पश्चिम महाराष्ट्रातील ०१ हजार मल्लांनी सहभाग नोंदवला.

१०० रूपयां पासून ते ०१ लाख ११,००० कुस्त्या लावण्यात आल्या. दिवसभरात लाखोंच्या बक्षिसांची लयलूट पैलवानांनी केली.

अंतिम विजेता ठरलेल्या पै. राघू ठोंबरे याला भास्करराव पाटील दानवे, राजेश राऊत, विष्णू पाचफुले, कुस्तीगीर परिषदेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. दयानंद भक्त, पै. लक्ष्मणराव सुपारकर यांच्या हस्ते चांदीची गदा ,रोख बक्षिस तसेच उपविजेता जगदीश राजपूत याला बक्षीस देण्यात आले. यावेळी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख , अशोक पडूळ पाटील,जगन्नाथ काकडे, समितीचे अध्यक्ष करण राजे जाधव, स्वागताध्यक्ष ड. आनंद झा, कार्याध्यक्ष सागर पाटील , सचिव ड.लक्ष्मण उढाण, किरण शिरसाठ, ड.सुनील काळे,बाळासाहेब देशमुख,बाबुराव मामा सतकर,पै.शिवाजी शेळके,गणेश सुपारकर, सतीश जाधव,शशीकांत घुगे, सुनील देशमुख,प्रशांत म्हस्के, ड. शैलेश देशमुख, रोहित देशमुख, शुभम टेकाळे,मंगेश देशमुख आदींची उपस्थिती होती.

अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नेपाणी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन झाले. त्यांनी मोबाईल ,व्हिडिओ गेम्स आणि मोबाईल च्या आहारी न जाता तरुणांनी मैदानी खेळाची कास धरावी. कुस्ती हा शक्ती आणि बुद्धीचा खेळ असून मराठा क्रांती मोर्चा उत्सव समितीने शिवजन्मोत्सवानिमित्त आयोजित कुस्ती स्पर्धेस शुभेच्छा दिल्या.

प्रस्ताविकात अरविंद देशमुख यांनी शिवकाळात कुस्तीला मानाचे स्थान होते . शिवजन्मोत्सवानिमित्त स्पर्धेच्या माध्यमातून युवकांना पारंपारिक खेळाकडे नेण्याचा प्रयत्न समितीने केला असल्याचे सांगितले.

समितीचे अध्यक्ष करण राजे जाधव यांनी समितीतर्फे सामाजिक उपक्रम राबविले जात असून युवा पिढीला मैदानी खेळाची प्रेरणा मिळावी यासाठी कुस्ती स्पर्धा आयोजित केल्याचे त्यांनी स्पष्ट केले. सुत्रसंचालन ड.स्वप्निल खराबे, यांनी केले तर सचिव किरण शिरसाठ यांनी आभार मानले. पंच कमिटीत डॉ. हर्षानंद भक्त,पै. विलास डोईफोडे,पै.शिवाजी शेळके, पै. सुधाकर कापसे,पै.गोविंद झुंगे, पै.कन्हैय्या भगत, पै. गणेश बटावाले,पै.कवल पठाण ,पै.सय्यद अन्वर, पै.बबन काजळे,पै.माधव राऊत, पै. सय्यद अफसर, पै. नंदलाल मेघावाले, पै. वैजिनाथ राऊत,प्रा.शाम काबलिये, पै. श्रीराम धानुरे, आदींनी काम पाहिले.

स्पर्धा स्थळी आ. अर्जुनराव खोतकर, माजी आ. अरविंदराव चव्हाण, अक्षय गोरंट्याल, पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे,उद्योजक गोपाल गोयल ,सगीर अहेमद, बाला परदेशी, रमेश जाधव, शेख इब्राहिम,सुभाष चव्हाण, वसंत जाधव, अंकुश राजगिरे, संदीप खरात, संतोष ढेंगळे, सचिन कांबळे,कारभारी रत्नपारखे यांच्या सह मान्यवरांनी भेटी दिल्या.

पै. शरद भालेराव आणि पै. राजेभाऊ देवकाते यांनी समालोचन केले. यावेळी कुस्तीपटू आणि शौकिनांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. रात्री पावणेदहा वाजता पै. राघू ठोंबरे आणि पै .जगदीश राजपूत यांच्यात अंतिम सामन्यास सुरुवात झाली. दोन्ही कसलेल्या पैलवानांनी आपले कसब पणास लावत तब्बल २५ मिनिटे एकमेकांना झुलवत ठेवले. कुस्ती न झाल्याने शेवटी कुस्तीगीर परिषदेच्या नियमानुसार एक मिनिट देण्यात आला. शेवटच्या मिनिटात राघू ठोंबरे यांनी पहिला पॉईंट मारून अंतिम विजेता होण्याचा बहुमान पटकावला.

## रेखा गुप्ता दिल्लीच्या मुख्यमंत्री

**नवी दिल्ली -** भाजपकडून दिल्लीच्या मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि विधानसभा अध्यक्षांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. त्यानुसार, रेखा गुप्ता मुख्यमंत्री, परवेश शर्मा उपमुख्यमंत्री आणि विजेंद्र गुप्ता विधानसभेचे स्पीकर असणार आहेत. दिल्लीतील राम लीला मैदानावर दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा संपन्न होणार आहे. पंतप्रधान मोदींसह दिग्गज नेते या सोहळ्याला उपस्थित राहणार आहेत.

युवा आदर्श

### योगीराणा ...

दिलेस तू भरभरून
झोळी माझी अशक्त
शेगावीचा योगीराणा
नाम मात्र तुझा भक्त
प्रांजळ ते मुखकमल
मन होई व्याधी मुक्त
गण गण गणात बोते
मंत्रोच्चार बोले फक्त
अर्पी तुज अल्पभाव
जाहल्या वेदना रिक्त
मनी तुझी मुर्ती वसे
अंत:करण होई तख्त
गजानन विजय पठन
प्रज्वलित उर्जा गुप्त
पिठले भाकरी प्रसादे
शमली भूक होई तृप्त
विभूति लावता भाळी
सम्राट हो अनभिषिक्त
दिलेस बा तू सर्वकाही
करी गा आता विरक्त
मुखी राहो तुझेचं नाव
येईलं जेव्हा अंती वक्त
जीव शिव एक व्हावे
इच्छा करी एक व्यक्त

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## उत्सव समितीतर्फे दुग्धाभिषेक


छाया/जावेद तंबोली

**जालना । प्रतिनिधी -** हिंदवी स्वराज्याची संस्थापक रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त शिवछत्रपती सांस्कृतिक क्रीडा मंडळ संचलित,सार्वजनिक, सर्वपक्षीय शिवजयंती उत्सव समितीतर्फे बुधवारी ( ता. १९) छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरात विधीवत दुग्धाभिषेक करण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज की जय धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज की जय ,राष्ट्रमाता, राजमाता,मॉ.साहेब जिजाऊ यांचा विजय असो. जय भवानी,,जय शिवाजी..., अशा गगनभेदी घोषणा देऊन शिवप्रेमींनी परिसर दणाणून सोडला. या प्रसंगी आ. अर्जुनराव खोतकर, अंकुशराव राऊत, पान २ वर

## पीसीएम जालनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन



**जालना । प्रतिनिधी -** छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने बुधवार (दि १९) रोजी प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालनाच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. महाराजांच्या पुर्णाकृती शिवमुर्तीस प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र (पीसीएम)चे राज्य सरचिटणीस व राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भरत मानकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी कुणबी सेना मराठवाडा संपर्कप्रमुख विष्णु कदम, पीसीएम जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, संतोष गुरव, रामेश्वर लोंढे, शेख उमर, संदीप भाकरे, शेख नबी सिपोराकर, नरेंद्र जोगड, योगेश पिछाडे, राहुल भालके आदींची उपस्थिती होती.

## जय छत्रपती शिवाजी-जय भारत पदयात्रा उत्साहात

**जालना । प्रतिनिधी -** केंद्र शासनाचा युवा कल्याण व क्रीडा मंत्रालय तसेच महाराष्ट्र शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्ताने १९ फेब्रुवारी रोजी जय छत्रपती शिवाजी-जय भारत पद यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार अर्जुन खोतकर, जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ, पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, महापालिका आयुक्त संतोष खांडेकर, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, यांची प्रमुख उपस्थिती होती.

राज्य व राष्ट्राच्या शाश्वत विकासात युवकांचे मोलाचे योगदान आहे. युवकांमध्ये नेतृत्व गुणांचा विकास होऊन व्यक्तिमत्व विकास, सामाजिक सेवाभाव तसेच शासकीय उपक्रमाबाबत माहिती व सहयोग यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

सदरील पदयात्रेला आज १९ फेब्रुवारी रोजी सकाळी नऊ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली आणि शहरातील विविध भागात जाऊन मोती बाग येथे समारोप करण्यात पान २ वर



## रमाबाई नगर-आनंद नगर येथे वॉल कंपाऊंड परिसरातून रस्ता द्या - बसपाची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील रेल्वे स्टेशन परिसरातील रमाबाई नगर व आनंद नगर येथील रहिवाशांना येजा करण्यासाठी रेल्वे कंपाउंड मधून रहदारीस रस्ता मोकळा करून द्यावा अशी मागणी जालना लोकसभा मतदार संघाचे खासदार डॉ. कल्याणराव काळे यांना बहुजन समाज पार्टीच्या वतीने निवेदन देऊन करण्यात आली आहे. यामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय थांबेल. या ठिकाणी रेल्वे प्रशासनाने वॉल कंपाऊंड बांधल्यामुळे येण्याजाण्यासाठी अडचणीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे येथून कायमस्वरूपी रस्ता मिळावा व रेल्वे भुयारी मार्गात पथदिवे बसवण्यात यावे अशी मागणी बहुजन समाज पार्टीच्या वतीने करण्यात आली आहे, याप्रसंगी पार्टीचे जालना विधानसभा अध्यक्ष राहुल करनाडे व शहर अध्यक्ष सिद्धार्थ मोरे यांनी केली आहे.

## जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ यांनी केली जालना शहराची पहाणी

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व जालना शहर महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर तसेच समस्त महाजन ट्रस्टचे पदाधिकारी यांनी आज इलेक्ट्रिक बाईक वरून जालना शहरातील विविध भागांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.

यावेळी शिवाजी महाराजांचा पुतळा पासून फुले मार्केट, सराफा बाजार, पाणी वेस येथील पाहणी केली. तसेच समस्त महाजन ट्रस्ट यांच्यामार्फत नदी रुंदीकरण व खोलीकरण करण्याच्या कामाची सुद्धा पाहणी केली.

जालना शहर महानगरपालिकेच्या महात्मा फुले व्यापारी संकुल या ठिकाणी पार्किंग अतिक्रमण व हातगाड्याची मोठी समस्या आणि सदरील परिसरामध्ये अस्वच्छता दिसून आली, त्यामुळे संबंधित स्वच्छता निरीक्षक सहाय्यक आयुक्त अतिरिक्त आयुक्त यांना फुले मार्केट परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा अशा सूचना दिल्या. याबाबत लवकरच बैठक लावून सदरील समस्याचे निराकरण करणे बाबत निर्णय घेण्यात येणार आहे.

एस आर पी एफ आर पी टी एस येथील रस्त्याच्या बाजूचे वॉकिंग ट्रॅक याची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी शहराच्या विविध भागांमध्ये नागरिकांकरीता सीएसआर फंडामधून वॉकिंग ट्रॅक उपलब्ध करून देण्याबाबत आपण प्रयत्न करू अशा स्वरूपाचे आश्वासन दिले. जिल्हाधिकारी यांनी शहरातील विविध भागातील विकास कामे बाबत पाहणी करून माहिती घेतली. तसेच जालना महापालिकेमार्फत तयार होत असलेला सांडपाणी प्रक्रिया केंद्र/ एसटीपी प्लांटला भेट देऊन झालेले कामकाज दर्जेदार करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सदरील काम अत्यंत चांगल्या प्रकारे असल्याचे समाधान व्यक्त केले. या योजनेमुळे शहरातील सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लागेल आणि शहर स्वच्छ होईल असेही म्हटले. आयुक्त यांनी माहिती दिली की सांडपाणी व्यवस्थापना अंतर्गत शहरातील नदीमध्ये ७७ ठिकाणी नाले येत असून, पान २ वर





# संपादकीय

## काळ- परिस्थिती बदलली...

मराठी पत्रकारितेची महान परंपरा बाळशास्त्री जांभेकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकमान्य टिळक, आचार्य अत्रे यांच्यापासून सुरू झाली. या काळातली छपाईची अपुरी साधने, त्या काळातल्या वृत्तपत्रांच्या संकल्पना वेगळी होती. वृत्त प्रकाशित करण्यासाठीचा जीव धोक्यात घालून त्यावेळी पत्रकारीता केल्या गेली. हे मराठी पत्रकारितेचे खरे कूळ आहे. आज आपण दर्पण दिन साजरा करतोय, बाळशास्त्री जांभेकर यांच्या पहिल्या दर्पण अकांनिमित्ताने हा दिवस राज्यात साजरा केला जातो. प्रभावी जनजागरण, समाजप्रबोधन करण्याचे माध्यम हे वृत्तपत्र होते. काळ ही बदलला आणि परिस्थितीही बदलली आहे. काळ- परिस्थिती बदलली. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म या रूपाने सुध्दा ओळखले जाते.म्हणुनच महाराष्ट्र सरकारने पत्रकार दिवस ६ जानेवारी या दिवशी बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त घोषित केला आहे.त्यामुळे महाराष्ट्र राज्यात ६ जानेवारी हा मराठी पत्रकार दिवस म्हणुन साजरा केला जातो. तर २० फेब्रुवारी हा दिवस त्यांचा जन्म दिवस आहे. हा दिवशी राज्यभरात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी होत आहे. जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखान करने. कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय.जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे. आज वृत्तपत्रांकडे व्यवसाय म्हणून पाहिल्या जात आहे. आणि याच मुळे जनजागरण आणि समाजप्रबोधन, सामाजिक मुद्दे बाजुला पडत आहे. ज्याची जेवढी जाहिरात त्यांची तेवढी प्रसिद्धी असा पायंडा पाडला जात आहे. जालना जिल्ह्यातील परिस्थितीही त्यापेक्षा वेगळी नाही. पुर्वी पत्रकार घडविले जायचे. जालन्यातील असंतोष, आणिबाणी सारख्या स्थानिक वृत्तपत्रांनी अनेक पत्रकार घडविले आहेत. यातील पत्रकार आता ज्येष्ठ पत्रकार झाले आहेत. आजच्या काळातील किती वृत्तपत्रे निर्भिड लिखान करतात. ते कुणाच्या दबावाखाली असतात याचा शोध घेणे महत्त्वाचे आहे. असो, दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन!

### पान १ वरुन

**उत्सव समिती ...**

सर्जेराव जाधव, रवींद्र राऊत,प्रकाश जगताप,दिगंबर पेरे, गोविंद गाजरे, समितीचे अध्यक्ष सतीश जाधव,कार्याध्यक्ष घनश्याम दास गोयल, स्वागताध्यक्ष ड. रवी डूरे, विमलताई आगलावे, विभावरी ताकट,संध्याताई देठे, शिवप्रकाश चितळकर, खंडेश जाधव,हिरालाल पिपरिये, दत्ता मालुसरे,विलास तिकांडे, सोमनाथ कदम, राजेश गायकवाड़, राजेंद्र हिवाले, रोहित नरके, हिरालाल पिपरिये यांच्या सह शिवप्रेमींची उपस्थिती होती.

**जय छत्रपती ...**

आला. पदयात्रेत माँ जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या वेशभूषेत युवक-युवतींनी सहभाग घेतला. तसेच शालेय, महाविद्यालयीन युवकांनी तसेच शालेय विद्यार्थी यांच्यासह खेळाडू, स्काऊट गाईड, एनएसएस, नागरिक शासकीय अधिकारी -कर्मचारी आदींनी सहभाग घेतला.

**जिल्हाधिकारी डॉ. ...**

या ठिकाणी नाल्यावर जे चेंबरचे बांधकाम व गेट तयार करण्यात आले आहे. तेथील लोखंड हे काही समाजकंटक काँक्रीट तोडून त्यातील लोखंड काढत आहे. या संदर्भात आपण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. सदरील प्लांट मुळे शहरात घाण पाणी हे नदीत न सोडता त्यावर ट्रीटमेंट केली जाणार असून यामुळे शहरातील डासांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. यावर मा. जिल्हाधिकारी यांनी पोलिसांना याबाबत सूचना देण्यात येतील. जर कोणी असे करत असताना आढळले तर त्यांच्यावर जास्तीत जास्त कडक कारवाई करण्याबाबत पोलिसांना आदेश देण्यात येतील असे आश्वस्त केले.

# पत्रकारिता ही भारतीय लोकशाहीची ढाल

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे. त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते.पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो. दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड, तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखान करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे.म्हणनु जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो.१९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतान्त्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते. पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन,वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात चौथास्तंभ.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात पत्रकारितेची शैली. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते. आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते. ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो.वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे.आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्रहोय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी दर्पणमध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदी टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही ईजा येवु दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो.अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. आज २० फेब्रुवारी जयंतीनिमित्त बाळशास्त्री जांभेकर यांना अभिवादन !

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी नागपूर**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# आद्य पत्रकार दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर

मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची आज जयंती. बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील पोंभूर्ले या गावी २० फेब्रुवारी १८१२ रोजी झाला. त्यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे महाराष्ट्रातील पहिले वृत्तपत्र सुरू केले. वयाच्या विसाव्या वर्षीच दर्पण हे वृत्तपत्र सुरू करून बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी वृत्तपत्र व्यवसायाचा पाया घातला. त्यांनीच १८४० मध्ये दिग्दर्शन हे मराठीतील पहिले मासिक काढले. बाळशास्त्री जांभेकर यांचा लोकशिक्षण व ज्ञानप्रसार हाच हेतू या उपक्रमामागे होता. सुधारकांच्या पहिल्या पिढीने पाश्चात्य विद्या व शिक्षण आत्मसात करून नवी जीवनमूल्ये वृत्तपत्र माध्यमाद्वारे रुजवली. त्या परंपरेचा पाया बाळशास्त्री जांभेकरांनी घातला. बंगालमध्ये राजाराम मोहन रॉय यांनी सुधारणांचे युग आरंभिले तेच कार्य बाळशास्त्री जांभेकरांनी महाराष्ट्रात केले. बाळशास्त्री जांभेकर हे लहानपणा पासून हुशार होते. वयाच्या तेराव्या वर्षी त्यांनी मराठी आणि संस्कृत विषयाचे अध्ययन पूर्ण केले. नंतर ते मुंबईला गेले तिथे त्यांनी इंग्रजी विषयाचे शिक्षण पूर्ण केले. इंग्रजी विषयात देखील त्यांनी नैपुण्य मिळवले. इंग्रजीतील त्यांचे नैपुण्य पाहून इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांची एल्फिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. त्या कॉलेजमध्ये एकूण सतरा प्राध्यापक होते त्यात बाळशास्त्री जांभेकर हे एकमेव मराठी प्राध्यापक होते. दादाभाई नौरोजी हे त्यांचेच विद्यार्थी होते. पुढे त्यांची नेमणूक शाळा तपासणीस म्हणून झाली. बोर्ड ऑफ एज्युकेशनने चांगले अध्यापक तयार करावेत अशी सूचना त्यांनी इंग्रज सरकारला केली ती सूचना मान्य करून इंग्रज सरकारने डीएड, बीएड कॉलेजची निर्मिती केली. ते शिक्षणाबाबत जितके



आग्रही होते तितकेच ते सामाजिक सुधारणे बाबत आग्रही होते. केवळ शिक्षणाचा प्रसार करून चालणार नाही तर सनातनी आणि प्रतिगामी लोकांच्या मनावर बेगडी श्रद्धांचा जो कालबाह्य पगडा आहे तो हटवला पाहिजे. लोकांच्या भावना, संवेदना विशाल उदार झाल्या पाहिजेत असे त्यांचे मत होते त्याकरिताच त्यांनी दर्पण नावाचे पहिले वर्तमानपत्र सुरू केले. दर्पणचा पहिला अंक ६ जानेवारी १८३२ रोजी प्रकाशित झाला. दर्पण हे द्विभाषिक वर्तमानपत्र होते. एकाच वेळी इंगजी व मराठीत निघणाऱ्या या वर्तमानपत्राच्या पानातील दोन स्तंभात डावीकडचा स्तंभ इंग्रजी भाषेत तर उजवीकडच्या स्तंभात मराठी भाषांतर असे त्यात एकूण आठ पाने असत. बाळशास्त्री जांभेकर यांनी वाचकांची मागणी वाढू लागल्याने दर्पण साप्ताहिक ४ मे १८३२ पासून सुरू केले. बाळशास्त्री जांभेकर हे निर्भीड पत्रकार होते. त्यांचे लेख विचारप्रवर्तक असत. इंग्रजांच्या नोकरीत असूनही ते इंग्रज सरकार विरुद्ध बेधडक लिहायचे त्याचप्रमाणे जातपात, कर्मकांड, अनिष्ट रूढी परंपरा यावर ते आपल्या लेखणीतून सातत्याने प्रहार करीत. ६ जानेवारी हा बाळशास्त्री जांभेकरांचा जन्मदिवस आणि योगायोगाने ६ जानेवारी रोजीच दर्पणचा पहिला अंक प्रकाशित झाला असल्यामुळे हा दिवस महाराष्ट्रात पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी निर्भीड पत्रकारिता करणाऱ्या पत्रकारांना विविध संस्थांकडून गौरविले जाते. त्यांचा सन्मान केला जातो. १८ मे १८४६ रोजी दर्पणकार बाळशास्त्री जांभेकरांचे निधन झाले. जयंती दिनी बाळशास्त्री जांभेकरांना विनम्र अभिवादन!



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# मराठी पत्रकारितेचे जनक : आचार्य बाळशास्त्री जांभेकर

'दर्पण' या वृत्तपत्राद्वारे मराठी भाषेतील पत्रकारितेची मुहूर्तमेढ रोवणारे; इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीच्या काळातील एक उच्चविद्याविभूषित, पंडिती व्यक्तिमत्त्व म्हणजे आचार्य बाळशास्त्री जांभेकर होत. १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी समाजमन घडविण्यात आचार्य बाळशास्त्री जांभेकरांचा फार मोठा वाटा होता. कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभुर्ले या गावी जन्मलेल्या बाळशास्त्रींनी अनेक विषयांचे अभ्यासक-संशोधक, अध्यापक, उत्कृष्ट लेखक, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार म्हणून आपल्या कार्याचा ठसा १८३२ ते १८४६ या काळात उमटवला.

भारतात ब्रिटिशांनी येताच कलकत्यामध्ये पहिलं वृत्तपत्र 'बेंगाल गॅझेट' नावानं इंग्रजी साप्ताहिक २९ जानेवारी, १७८० रोजी सुरु केले. ब्रिटिश सरकारने आपल्या स्वार्थासाठी ठिकठिकाणी मुद्रणालयं सुरु केली. समाज प्रबोधन करण्यासाठी हे महत्वाचं साधन आहे. त्याकरीता समाजाचे विचार परिवर्तन न होणारे वृत्तपत्र निघू नये अशी त्यांची धारणा होती. परंतू कालांतराने आपले विचार प्रकट करण्यासाठी वृत्तपत्र हे प्रभावी माध्यम असल्याची भारतीयांना जाणीव झाली. यानंतर अनेक भारतीय भाषांतील वृत्तपत्र निघू लागली. बंगालीनंतर मराठी असा भाषिक वृत्तपत्रांचा क्रम लागतो.

ब्रिटीशांनी भारतात आपलं बस्तान सार्वजनिक केल्यानंतर पाश्चिमात्य संस्कृती मूल्यांचा भारतातील पारंपरिक जुन्या मूल्यांशी संघर्ष निर्माण झाला. तथापि, पाश्चात्य संस्कृतीच्या परिचयामुळं भारतीय पंडितांना समाजातल्या घडामोडींची भौतिक दृष्टीनं कारणमीमांसा करण्यास प्रोत्साहनही मिळालं. समाजातील वर्णव्यवस्था, जातीभेद, स्त्री दास्य, सती प्रथा, अस्पृश्यता, बालविवाह आदी जुन्या मूल्यांचा पुनर्विचार करण्यास पंडितांना भाग पाडलं यातूनच एकसंध समाज निर्माण करण्यासाठी समाजातील भेदाभेद गेले पाहिजेत. याची त्यांना जाणीव झाली. हळूहळू समाज प्रबोधनांची प्रक्रिया सुरु झाली. यातच वृत्तपत्रांच आगमन ही घटना क्रांतीकारक ठरली. ब्रिटीश सरकारच्या अधिपत्याखाली असलेल्या कलकत्ता, मद्रास (चेन्नई), मुंबई येथे इंग्रजी वृत्तपत्रांची सुरुवात झाली. परंतू जनतेच्या अस्तित्वाला या वृत्तपत्रात विशेष स्थान देण्यात येत नसे. या वृत्तपत्रांवर सरकारचे विशेष लक्ष होतं. जहाजांची ये-जा, जाणाऱ्या - येणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावं, सरकारी जाहिराती आदी मजकूर



वृत्तपत्रांत प्रसिध्द करण्यात येत असे. यामुळे भारतीय सुशिक्षित वर्गात वृत्तपत्र ही कल्पना रुजू लागली आणि तर इंग्रजी भाषेत वृत्तपत्रं निघतात तर भारतीय भाषांतही अशी वृत्तपत्रं का निघू नयेत असा प्रश्न निर्माण झाला. आणि कलक- त्याचा उत्तम वापर प्रबोधनासाठी करून घेतला. यात विशेष उल्लेख त्यांनी हाताळलेल्या विधवांच्या पुनर्विवाहाच्या प्रश्नांचा व वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या प्रसाराचा करावा लागेल. बाळशास्त्रींनी या विषयांवर विपुल लिखाण केले. त्यामुळे त्यावर विचारमंथन होऊन त्याचे रूपांतर पुढे विधवा पुनर्विवाहाच्या चळवळीत झाले. ज्ञान, बौद्धिक विकास आणि विद्याभ्यास या गोष्टी त्यांना महत्त्वाच्या वाटत. उपयोजीत ज्ञानाचा प्रसार समाजात व्हावा, ही त्यांची तळमळ होती. देशाची प्रगती, आधुनिक विचार आणि संस्कृतीचा विकास यासाठी वैज्ञानिक ज्ञानाची गरज आहे, तसेच सामाजिक प्रश्नांकडे पाहण्याच्या विवेकनिष्ठ भूमिकेसाठी शास्त्रीय ज्ञानाच्या प्रसाराची आवश्यकता आहे, याची जाणीव त्यांना झाली होती. विज्ञाननिष्ठ मानव उभा करणे हे त्यांचे स्वप्न होते. थोडक्यात, आजच्यासारखा ज्ञानाधिष्ठित समाज त्यांना दोनशे वर्षांपूर्वीच अपेक्षित होता. त्या अर्थाने ते द्रष्टे समाजसुधारक होते. सार्वजनिक ग्रंथालयांचे महत्त्व ओळखून त्यांनी 'बॉम्बे नेटिव्ह जनरल लायब्ररीची स्थापना केली. विविध समस्यांवर सकस चर्चा घडवण्यासाठी 'नेटिव्ह इंप्रुव्हमेंट सोसायटी'ची स्थापना केली. यातूनच पुढे 'स्टुडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी' या संस्थेला प्रेरणा मिळाली व दादाभाई नौरोजी, भाऊ दाजी लाड यांसारखे दिग्गज कार्यरत झाले. सन १८४० मध्येच त्यांनी 'दिग्दर्शन' या मराठीतील पहिल्या मासिकाची सुरुवात केली. या मासिकाचे संपादक म्हणून त्यांनी ५ वर्षे काम पाहिले. या मासिकातून त्यांनी भूगोल, इतिहास, रसायन शास्त्र,पदार्थ विज्ञान, निसर्ग विज्ञान आदी विषय नकाशे व आकृत्यांच्या साहाय्याने प्रसिद्ध केले. या अभिनव माध्यमातून त्यांनी लोकांची आकलनक्षमता वाढवण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या विद्वत्तेला जोड होती ती त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वाची. संस्कृत, मराठी, इंग्रजी आणि हिंदी या त्या काळच्या प्रचलित भाषांवर त्यांचे प्रभुत्व होतेच, याशिवाय ग्रीक, लॅटिन, फ्रेंच, बंगाली आणि गुजराती भाषाही त्यांना उत्तम अवगत होत्या. या भाषांसह विज्ञान, गणित, भूगोल, शरीरशास्त्र व सामान्य ज्ञान या विषयांवरही त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. आज मराठीतील वृत्तपत्रांचे जनक असा जसा त्यांचा नावलौकिक आहे, तसाच एल्फिन्स्टन कॉलेजमधील नावाजलेले, हिंदीचे पहिले प्राध्यापक असाही त्यांचा लौकिक आहे. त्याचबरोबर रॉयल एशियाटिक सोसायटीच्या त्रैमासिकात शोधनिबंध प्रसिद्ध झालेले पहिले भारतीय असाही मान त्यांच्याकडे जातो. सन १८४५ मध्ये त्यांनी केलेले ज्ञानेश्वरीचे मुद्रण हे या ग्रंथाचे पहिले मुद्रण मानले जाते. बाळशास्त्रींनी कुलाबा वेधशाळेचे संचालक म्हणूनही काम पाहिले. तसेच त्यांनी नीतिकथा, इंग्लंड देशाची बखर, इंग्रजी व्याकरणाचा संक्षेप, हिंदुस्थानचा इतिहास, शून्यलब्धी गणित आदी ग्रंथांची निर्मिती केली. साधारणपणे सन १८३० ते १८४६ या काळात बाळशास्त्रींनी आपले योगदान महाराष्ट्राला (व भारताला) दिले. या काळात बहुसंख्येने समाज निरक्षर, अंधश्रद्ध व अज्ञानी होता. म्हणूनच अवघ्या ३३ वर्षांच्या आयुष्यात, विविध क्षेत्रांत त्यांनी केलेले प्रचंड कार्य मूलभूत, मौल्यवान व अद्भूत ठरते. ६ जानेवारी रोजी 'दर्पण'चा पहिला अंक प्रसिद्ध झाला. हाच योगायोगाने बाळशास्त्रींचाही जन्मदिवस. त्यांच्या स्मृत्यर्थ हाच दिवस 'पत्रकार दिन' म्हणून आज महाराष्ट्रात साजरा केला जातो. २० फेब्रुवारी १८१२ रोजी त्यांचा जन्म झाला हा दिवशी महाराष्ट्र राज्यात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी करण्यात येते आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक परिवर्तनासाठी त्यांनी आपल्या पत्रकारितेचा वापर केलाय त्याच बरोबर जातीभेद निर्मुलन आणि विधवा पुनर्विवाह यालाही त्यांनी प्राधान्य दिलं. त्यामुळेच त्यांचा उल्लेख आद्य समाजसुधारक असा केला जातो. परंतु कोकणातील राजापूर तालुक्यातील पोंभूर्ले येथे १८१२ च्या उतरार्धात जन्म झालेल्या बाळशास्त्री यांच वयाच्या अवघ्या ३३ वर्षी सन १८४६ मध्ये निधन झालं.

# स्वराज्याचा मान; परस्त्री माते समान - युवराज साळुंखे

**टेंभुर्णी । प्रतिनिधी -** शहरातील नवभारत शिक्षण संस्थेच्या श्रीमती. जे. बी. के विद्यालय व नवभारत उच्च माध्यमिक विद्यालयात आज दि. १९फेब्रु.२०२५रोजी , हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण, गनिमी कावा युद्ध नितिचे जनक, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात बाल व्याख्याता युवराज साळुंखे यांने स्वराज्यामध्ये स्त्रीयांना सन्मानाची वागणूक दिली जात होती,परस्त्री माते समान मानावे असे आदर्शवत विचार छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यात रूजलेले होते,व आज आपल्याला याच विचारांची कास धरून वाटचाल करायची आहे. असे मत मांडले,पुण्या जवळील रांझे गावातील घटना सांगतांना, शेतकऱ्याच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या बाबाजी भिकाजी गुजर या रांझाच्या पाटलाला दिलेली शिक्षा, छत्रपती. शिवाजी महाराज यांच्या न्यायप्रियतेची साक्ष देते. आपण ही आदर्श नितिमान समाज निर्माण करण्यासाठी आपल्या देशात स्त्रियांना उचित सन्मान दिला पाहिजे, स्त्री पुरुष समानतेचा पुरस्कार केला पाहिजे,असे मत मांडले. या शिवजयंती सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कार्यक्रमात अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले, सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले , आम्ही शिवकन्या या गीतातुन शिवबांना अभिवादन करण्यात आले,कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य. नंदकुमार काळे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक. पंजाबराव सोळंके, पर्यवेक्षक. धनंजय पुराणे, उपप्राचार्य संचालक प्राध्यापक दत्ताजीराव देशमुख टेंभुर्णीकर . एस.बी. बोरकर, जेष्ठ शिक्षक प्राध्यापक कैलास जाधव,. गणेश सावसक्के, विष्णू जाधव, आदींची प्रमुख



उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिवसन ससाणे यांनी केले तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, दत्ता उखर्डे,राजेंद्र जगताप,प्रा. रामदास भांगे,प्रा.कैलास जाधव, कार्यालयीन प्रमुख.सुनील सकुंडे,प्रा.गजानन धोटे,राजुभाऊ डोमळे, नागोराव देशमुख, विनोद देशमुख, आदींनी परिश्रम घेतले. वकृत्वस्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांना गणेश सावसक्के यांच्या वतीने रोख स्वरूपात बक्षिसे देण्यात आले.शेवटी आरती गोरे,व भारती गोरे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर आधारित पोवाडा सादर केला, व कार्यक्रमाची यशस्वी सांगता झाली.

## चैतन्यसाधना संस्थेला आचार्य भानुकवी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील चैतन्यसाधना आणि संशोधन प्रतिष्ठान या संस्थेला संतसाहित्याचे संशोधन व संपादनासाठी तसेच भारतीय साहित्य संस्कृती आणि तत्वज्ञान क्षेत्रातील महत्वपूर्ण योगदानाबद्दल आचार्य भानुकवी साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने आचार्य भानुकवी राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला असून दिनांक २४ फेब्रुवारी २०२५ रोजी होणाऱ्या दुसरे भानुकवी महानुभाव मराठी साहित्य संमेलनात संमेलनाध्यक्ष डॉ.अविनाश आवलगावकर व महंत बा.भो.शास्त्री यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.



चैतन्यसाधना आणि संशोधन प्रतिष्ठान ही संस्था गेल्या पाच वर्षांपासून अध्यात्मिक व शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करीत आहे.संस्थेमार्फत संशोधनपर दोन, अध्यात्मिक आठ व दोन दिवाळी अंकांचे प्रकाशन करण्यात आले आहे. अंबड तालुक्यातील शेवगा व परिसरातील अनेक गावांमधून संकष्टी चतुर्थी सोहळे घेऊन संतसाहित्याचा प्रसार करण्यात आला आहे. संस्थेच्या वतीने जालना शहरात दरवर्षी ज्ञानेश्वरी अभ्यास वर्गांचे आयोजन करण्यात येत असते.संत संमेलनांचे आयोजन करून विविध संतांच्या विचाराची आदानप्रदान करण्यात येते. संस्थेच्या वतीने दोन आंतराष्ट्रीय शैक्षणिक चर्चासत्रांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्याची दखल घेऊन संस्थेला हा पुरस्कार घोषित झाला आहे.या सन्मानाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.प्रमोद कुमावत,उपाध्यक्ष निरंजन जहागीरदार,सचिव डॉ.जयश्री किनारीवाल,सहसचिव सागर महारज चापाईतकर,कोषाध्यक्ष सीताराम आहेर,सदस्य सुधाकर तरटे,अनिरुद्ध किनारीवाल,अश्विनी पन्हेर, प्रशांत जाधव, डॉ. शंकर तिकांडे,डॉ.प्रकाश मांटे,डॉ.नंदकिशोर डंबाळे,डॉ.ऋषीबाबा शिंदे,डॉ.प्रमोद पाटील,शंकर जोशी,महेश उफाड,दत्ता वाघमारे,संदीप भांदरगे,अशोक चुनखडे,आदी सभासदांनी आनंद व्यक्त केला आहे.

## ब्राह्मण सभेच्यावतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन

**जालना । प्रतिनिधी -** ब्राह्मण सभा भवन येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती समस्त ब्राह्मण समाजाच्या वतीने साजरी करण्यात आली, सर्वप्रथम ब्राह्मण सभेचे अध्यक्ष कल्याणराव देशपांडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांना पुष्पहार अर्पण केला, प्रा.मुकुंद कुळकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनाबाबत माहिती दिली. याप्रसंगी रमेश देहेडकर, डॉ.सुभाष भाले, रवी देशपांडे, भगवान पुराणिक, सतीश अकोलकर, संजय कीर्तने, अमोल देशमुख, योगेश गायकवाड, आकाश पळसकर, राहुल सुसर, अनिमेष पांडव, मिलिंद राजाळे आदी उपस्थित होते.




## जालन्यात २३ फेब्रुवारी रोजी मुतावल्ली कार्यशाळा

**जालना -** ऑल इंडिया मुतावल्ली इनामदार ऑर्गनायझेशनच्या वतीने जालन्यात एकदिशसीय मुतावल्ली कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलंय. २३ फेब्रुवारी २०२५ रोजी जालना शहरातील उर्दू हायस्कूल येथे दुपारी १२.३० ते संध्याकाळी ५ या वेळेत ही कार्यशाळा पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी हाफिज नाझीम सिद्दीकी यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. त्याच बरोबर महाराष्ट्र वक्फ मंडळाचे अध्यक्ष समीर काझी हे देखील उपस्थित रहाणार असल्याचं ऑल इंडिया मुतावल्ली इनामदार ऑर्गनायझेशनकडून कळविण्यात आलंय. आमदार अर्जुन खोतकर, हिकमत उढाण, सय्यद जुनैद, काझी मोहम्मद शफी, अँड.एसएस काझी, अँड.निसार अहमद खान यांचीही या कार्यक्रमासाठी उपस्थिती असणार आहे.

# मराठीचा अभिजात दर्जा मराठीला व्यापकता प्रदान करेल

माझा मराठाची बोलू कौतुके परी अमृततेही पैजा जिंके,असा मराठीचा गौरव संत ज्ञानेश्वर यांनी केला आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने भारतातील सर्व ४५०विद्यापीठांमध्ये मराठी शिकवण्याची सोय करणे शक्य होणार आहे. त्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये वित्तीय तरतुदीची सोय होणार आहे.मराठीच्या उत्कर्षासाठी काम करणाऱ्या संस्था,व्यक्ती विद्यार्थी अशा साऱ्यांना भरीव मदत मिळणे शक्य होईल. सध्या देशात तमिळ, तेलुगु संस्कृत, कन्नड मल्याळम व ओरिया या सहा भाषांना अभिजात भाषेचा दर्जा मिळालेला आहे. आता मराठी भाषेला जवळपास २३ वर्षांनी अभिजात भाषेचा दर्शा मिळालेला आहे.मराठी भाषेला जवळपास दोन हजार वर्षांपासूनचा इतिहास आहे. रंगनाथ पठारे यांच्या अध्यक्षतेखाली असणाऱ्या समितीने मराठी भाषा ही महाराष्ट्र हा प्रदेश अस्तित्वात येण्याच्या फार पूर्वीपासून प्रचलित होती आणि मराठीचे वय किमान अडीच हजार वर्ष जुने असल्याचे पुरावे दिले आहेत.मराठी भाषा ज्ञानभाषा होण्यासाठी मोठ्या प्रमाणामध्ये शासकीय व सामाजिक स्तरावर प्रयत्न होणे गरजेचे आहे. शिक्षण,वाणिज्य, तंत्रज्ञान,कृषी संगणक, जागतिक ज्ञान भाषांतर, संगीत,चित्रकला अशा सर्व क्षेत्रात मराठीचा वापर वाढवला पाहिजे. मराठी भाषांतर केंद्र स्थापन करून इतर भाषेतील अभिजात साहित्यकृती मराठीत व मराठीतील अभिजात साहित्यकृती इतर भाषांमध्ये नेल्यामुळे मराठी भाषा जागतिक पातळीवर जाईल यात शंका नाही.न्यायदानाचे काम देखील मराठीमध्ये व्हावे यासाठी जोमाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. बस स्टॅन्ड रेल्वे,हवाई अड्डे इथे देखील मराठीत सूचना प्रणाली असायला हवी. वर्तमानपत्रे,चित्रपट,टीव्ही सिरीयल रस्त्यावरील सूचना देणारे बोर्ड हे देखील मराठी भाषा संवर्धनासाठी आणि प्रसारासाठी मोठं काम करत असतात. त्याकडे सर्वच लोकांनी लक्ष देणे गरजेचे आहे. अशाप्रकारे मराठी भाषा खालपासून वरपर्यंत पसरत जाईल व उन्नत होईल. आपल्याला मराठीचा अभिमान बाळगायचा असेल तर आपला सर्व व्यवहार मराठी मधून करणे गरजेचे आहे.

**राजक्रांती वलसे**

# सकारात्मक विचार करुन परीक्षा द्या!

फेब्रुवारी मार्च महिना म्हटलं की परीक्षांचा हंगाम. दरवर्षी याच दोन महिन्यात परीक्षा होतात. दहावी बारावी या बोर्डाच्या परीक्षाही याच काळात असतात. इतकेच काय तर शिष्यवृत्ती, नवोदय यासारख्या स्पर्धा परीक्षाही याच काळात होतात. इयत्ता ५ वि आणि ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षा नुकत्याच पार पडल्या. दहावीची बोर्ड परीक्षा उद्यापासून म्हणजे २१ फेब्रुवारी पासून सुरू होत असून ती १७ मार्च पर्यंत असणार आहे. बारावीची परीक्षाही ११ फेब्रुवारी रोजी सुरू झाली असून ती ११ मार्च पर्यंत चालणार आहे. या परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील मैलाचा दगड असतो. विद्यार्थ्यांच्या आयुष्याला कलाटणी देणाऱ्या या परीक्षा असतात म्हणूनच या परीक्षा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाच्या असतात. दहावी - बारावीची बोर्ड परीक्षा म्हणजे विद्यार्थी आणि पालकांसाठी कमालीचे टेन्शन. करियरच्या दृष्टीने आणि पुढील अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी बोर्ड परीक्षेच्या गुणांना खूप महत्व असते. त्यामुळे विद्यार्थी वर्षभर भरपूर अभ्यास करत असतात. पण प्रत्यक्ष जेंव्हा परीक्षा जवळ येते तेंव्हा मात्र विद्यार्थ्यांचे टेन्शन वाढते. ते साहजिकच असले तरी या काळात विद्यार्थ्यांनी टेन्शन फ्री राहणे महत्वाचे आहे कारण नकारात्मक विचार घेऊन जर विद्यार्थी परीक्षेला गेला तर त्याचा विपरीत परिणाम होऊन वर्षभर केलेल्या मेहनतीवर पाणी पडू शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत प्रसन्न रहावे. सतत अभ्यास करण्याऐवजी मध्येमध्ये ब्रेक घेऊन थोडा वेळ टीव्ही पाहणे, संगीत ऐकणे, लहान मुलांशी खेळणे, बाहेर फिरून येणे, मित्रांशी अभ्यासाव्यतिरिक्त इतरही विषयांशी चर्चा करणे, गप्पा मारणे, चित्र काढणे, आवडती पुस्तके वाचणे अशा गोष्टी कराव्यात. रात्री जागरण करणे टाळावे. विद्यार्थ्यांनी परीक्षा कालावधीत मोबाईलपासून दूरच राहावे. वेळेवर झोपून वेळेवर उठावे. अभ्यासाचा खूप ताण आल्यास विश्रांती घ्यावी. या काळात शक्यतो बाहेर खाणे टाळावे. घरी बनवलेले जेवण वेळेवर करावे. पालकांनीही याकाळात सकारात्मक राहावे. आपल्या पाल्यांवर अभ्यासासाठी दबाव आणू नये. त्याला सतत परीक्षेची आठवण करून देऊ नये. त्याच्याशी हसून खेळून प्रेमाणे वागावे. पालकांनी स्वतःही परीक्षेचे टेन्शन घेऊ नये आणि मुलांनाही देऊ नये. जर विद्यार्थी परिक्षेचे टेन्शन न घेता सकारात्मक विचार घेऊन परीक्षेला गेला तर यश निश्चित मिळेल. दहावी बारावीच्या परीक्षा आयुष्यातील महत्वाचा टप्पा असला तरी शेवटचा टप्पा नाही त्यामुळे टेन्शन फ्री राहा. मन शांत ठेवून प्रश्नपत्रिका सोडवा. यश नक्की मिळेल. सर्व विद्यार्थी मित्रांना या बोर्ड परीक्षांसाठी मनापासून शुभेच्छा!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# श्री संत गजानन महाराज अद्भुत दैवी शक्ती

श्री संत गजानन महाराजांची महिमा अपरंपार आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.त्यामुळेच त्यांना ब्रम्हांडनायक राजाधिराज योगीराज असे संबोधले जाते.कारण त्यांची महिमा संपूर्ण ब्रम्हांडात प्रचलित असल्याचे दर्शविते. आज जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तर आपल्या लक्षात येईल की भारतात महाराष्ट्राला संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. कारण महाराष्ट्रात अनेक थोर संत,महात्मे झालेत त्यातलेच संत गजानन महाराज आहेत.आपल्याला गजानन महाराजांचे अनेक चमत्कार दिसून येतात.त्याचप्रमाणे संपूर्ण भारतात शांततेचे प्रतिक म्हणून शेगावचे गजानन महाराजांचे मंदिर व तेथील परिसर प्रसिद्ध आहे. संत गजानन महाराज माघ वद्य ७ शके १८००(दिनांक २३ फेब्रुवारी १८७८) रोजी बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे तारूण्याअवस्थेत प्रगत झालेत.आज संपूर्ण भारतात श्री संत गजानन महाराजांमुळे महाराष्ट्रातील शेगाव हे गाव प्रसिध्दीस आले.साधू देविदास पातूरकरांच्या मठाबाहेर पडलेल्या उष्ट्या पत्राळीतील अन्नाचे कण वेचून खात होते व गाईगुरांकरीता पिण्यासाठी ठेवलेले पाणी पिऊन निघून गेले.ते पुढे बार्शी येथील ब्रम्हनिष्ठ श्रीगोविंद महाराज टाकळीकर यांचे शेगावी महादेवाच्या मंदिरात कीर्तन झाले. त्याप्रसंगी टाकळीकरांच्या बेफाम असलेल्या घोड्यांच्या चौपायांत श्री गजानन महाराज हे ब्राह्मानंदी निमग्न होऊन निजलेले आढळले परंतु तुफान घोडा शांत झाला. अशाप्रकारे तुफान घोड्याला गजानन महाराजांनी शांत केले.तत्काळ गोविंदमहाराजांनी संत गजानन महाराजांची योग्यता ओळखुन भक्तीभावाने पूजा केली व त्यांची महती शेगाव निवासी लोकांना सांगितली. तेव्हापासुनच संत श्री गजानन महाराजांची प्रसिद्धी झाली.यानंतर महाराजांचे अनेक चमत्कार लोकांना दिसून आले. बंकटलाल अग्रवाल यांना गजानन महाराज प्रथमच दिसले असता गण गण गणात बोते असे उच्चारत त्यांचे भजन नेहमीच सुरू असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांना गजानन महाराज ही अद्भुत शक्ती असल्याचे लक्षात आले व गण गण गणात बोते हा जाप सर्वांच्याच हृदयात बसला व गजानन महाराजांची महीमा संपूर्ण शेगावी पसरली. कारण गजानन महाराज ही दैवी शक्ती होती आणि आहे.गजानन महाराजांचे अनेक चमत्कार आपल्याला वेगवेगळ्या ठिकाणी आणि वेगवेगळ्या रूपात पहायला मिळतात.महाराजांच्या तीर्थानेच जानराव देशमुख नावाच्या गृहस्थ



मरणोन्मुख स्थितीतुन बरे झाले. अनेक भक्तांना साक्षात पांडुरंगाचे दर्शन गजानन महाराजांनी घडविले.गजानन महाराज हे दिगंबर वृत्तीतील सिध्दकोटीला पोहचलेले महान संत होते. त्यांची दिनचर्या अशा पध्दतीची होती की वाटेल ते खावे, कोठेही पडुन रहावे व कोठेही संचार करावा अशा पध्दतीने ते रहात असे.एकेवेळी तर एका स्त्रीने मिर्चीचा वाटलेला मोठा गोळा खायला दिला तो गोळा त्यांनी मोठ्या आनंदाने खाल्ला जनुकाय पेढे-बर्फी खातात याप्रमाणे खाल्ला व लोटाभर पाणी पिऊन तृप्त झाले गण गण गणात बोते असे अहर्निश भजन उच्चारत निघून गेले.गजानन महाराजांच्या मुखातून नेहमीच गण गण गणात बोते या शब्दांचे उच्चारण व्हायचे त्यामुळे संपूर्ण भक्तगण श्री संत गजानन महाराज म्हणुन संबोधु लागले.गजानन महाराजांची अपार महिमा पाहून लोक त्यांना बहुमोल वस्त्रे, अलंकार,पैसे, खाद्य पदार्थ अर्पण करीत.परंतु हे सर्वच तेथेच टाकून निघून जात असे. मुख्यत्वेकरून भक्तांना व जनतेला गजानन महाराजांच्या सहवासाने मन:शांति मिळे व त्यांच्या ईश्वरलिलेमुळे सर्व भक्तगण प्रसन्न रहात.आजही महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात श्री संत गजानन महाराजांची पुजाअर्चना मोठ्या भक्तिभावाने व उत्साहाने साजरी केली जाते.त्याच अनुषंगाने दरवर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला श्री संत गजानन महाराजांचा प्रगट दिवस मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.यावर्षी माघ कृष्णपक्ष सप्तमीला दिनांक २० फेब्रुवारीला संपूर्ण महाराष्ट्रात मोठ्या उत्साहाने गजानन महाराजांचा १४७ वा प्रगट दिवस साजरा होत आहे.दरवर्षी विठ्ठलाच्या दर्शनासाठी शेगाव वरून संत गजानन महाराजांची पालखी जात असते व पालखी सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा होतो.कारण गजानन महाराजांनी विठ्ठल रूपी अनेकांना दर्शन दिले आहे.दररोज शेगावला हजारोंच्या संख्येने वेगवेगळ्या भागातुन भाविक श्री संत गजानन महाराजांच्या दर्शनासाठी येतात. त्याचप्रमाणे याठिकाणी दररोज मोठ्या प्रमाणात महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते.कारण महाराष्ट्रासह अनेक राज्यातुन महाराजांचे दर्शन करण्यासाठी मोठा जनसमुदाय येत असतो अशा प्रकारे श्री संत गजानन महाराजांची लीला अपरंपार असल्याचे आपल्याला दिसुन येते.महाराष्ट्रात घरोघरी गजानन महाराजांची पुजाअर्चना करून भक्तीभावाने संत गजानन महाराजांचा गजर करतात व आपली मनोकामना पूर्ण करतात. त्याचप्रमाणे प्रगट दिनाच्या निमित्ताने अनेक गावांत,शहरात मोठ्या प्रमाणात भजण, किर्तन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात येते व आपल्याला सर्वत्र संत गजानन महाराजांचा गजर ऐकायला मिळतो. संत गजानन महाराज हे महान संत होऊन गेले त्यामुळे त्यांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण होणे गरजेचे आहे. कारण दिवसेंदिवस जंगलसंपदा नष्ट होतांना आपण पहातो. परंतु प्रगट दिनाच्या निमित्ताने फुल-नाही-फुलांची- पाकळी म्हणून सर्वांकडून वृक्षारोपण व्हायला हवे.कारण जंगल तोडीमुळे संपूर्ण निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे व हे सर्व आपण उघड्या डोळ्यांनी पाहत आहोत. याचाच परिणाम आपल्यालाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीला भोगावा लागतो आहे.आपण निसर्गाचे संतुलन व्यवस्थित ठेवले नाही तर सुनामी, भूकंप,वनवालागने, समुद्राची पातळी वाढणे,अती थंडी,अती उष्णता,अती पाऊस,भुस्खणन याला मोठ्या प्रमाणात उफान येवु शकते व यामुळे मानवास,पशु-पक्षी, जीवजंतू यांची मोठी हानी होवू शकते.याकरीता आज निसर्गाला वाचविण्यासाठी वृक्षलागवड ही काळाची गरज आहे.आपण व संपूर्ण भक्तगणांनी श्री संत गजानन महाराजांच्या प्रगट दिनाच्या निमित्ताने वृक्षलागवड केली तर निसर्ग प्रफुल्लित राहिल व प्रत्येक झाडांच्या पानात,फुलात, फळात आपल्याला गजानन महाराजांचे दर्शन अवश्य होईल. कारण गजानन महाराजांचे संपूर्ण जीवन हे झाडांच्याच सानिध्यात रहाले आहे.वृक्षलागवडीमुळे गुरांना चारा व संपूर्ण जीवसृष्टीला ऑक्सिजन व सावली मिळेल. यातच आपल्या साक्षात संत गजानन महाराज अवश्य दिसून येईल व आपण केलेल्या कार्याचे सार्थक अवश्य दिसून येईल. त्यामुळे भक्तांना आग्रहाची विनंती



आहे की प्रगट दिनाच्या निमित्ताने जास्तीत जास्त वृक्षारोपण व्हावे या दृष्टिकोनातून पाऊल उचलण्याची नितांत गरज आहे.श्री संत गजानन महाराजांच्या १४७ व्या प्रगट दिनानिमित्त कोटी कोटी प्रणाम! जय गजानन महाराज!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**माजी विद्यापीठ प्रतिनिधी**
**नागपूर, मो.नं.९९२१६९०७७९**

# जालन्यात शिवजयंती निमित्त शिवचरित्राचे वाटप

## जालना येथील आधार ग्रुपचा उपक्रम



**जालना । प्रतिनिधी -** शिवजयंती निमित्त छत्रपती शिवाजी महाराज चौकात ३०० प्रती शिवचरित्राचे वाटप करण्यात आलंय. जालन्याच्या आधार ग्रुपने हा उपक्रम राबवला असून मागील ३ वर्षांपासून आधार ग्रुपकडून ३०० प्रती शिवचरित्राचे वाटप करण्यात येते. आज छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरी होत असून जालन्यात देखील याचा मोठा उत्साह पाहायला मिळतात आहे. जालन्यात शिवजयंती निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून आधार ग्रुप कडून ३०० प्रती शिवचरित्राचे वाटप करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आलाय. या कार्यक्रमास सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, म हापालिका उपआयुक्त नंदाताई गायकवाड, सहायक उपायुक्त अपर्णाताई जाधव, केशव कानपुडे, सहायुक्त अनुराधा नागोरी, लेखापाल सचिन मेहरा, पो.कॉ.साबळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आश्विन आंबेकर, संदीप मगर, कुणाल देशमुख, आकाश बारगजे, कुणाल खाकीवाले, स्वप्नील राऊत, अमित मोरे, दीपक बारवकर, ज्ञानेश्वर बदर, आकाश काजळे, विशाल वाघमारे, ओम वाघमारे आणि गणेश डोके हे उपस्थित होते.

# यशासाठी शिवचरित्र कृतीत उतरवावे - भास्कर दानवे

**बदनापूर । प्रतिनिधी -** प्रतिकूल परिस्थिती प्रचंड आव्हाने ,संकटांचा सामना करण्याचे बळ छत्रपती शिवरायांच्या चरित्रातून मिळते. जीवनात यशस्वी होण्यासाठी शिवरायांच्या विचारांवर मार्गक्रमण करावे. असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे नेते भास्करराव पाटील दानवे यांनी केले.

व्ही. एस. एस. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी महाविद्यालयात शिवजयंती सोहळा विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. भास्करराव पाटील दानवे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. तसेच प्राचार्य डॉ. प्रसाद मदन यांच्या अध्यक्षतेखाली ड. वैशाली कडू यांचे व्याख्यान झाले. भाजपाचे जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे ,गोवर्धन कोल्हे, प्राचार्य गुलशन राठी, यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. वैशाली कडू यांनी सर्व घटकांना समान न्याय देणारे छत्रपती शिवरायांची प्रेरणा जगाने घेतली असून युवा पिढीने व्यसनांच्या आहारी न जाता शिवनीतीचा अवलंब करावा असे आवाहन त्यांनी केले. अध्यक्षीय समारोपात प्राचार्य डॉ.प्रसाद मदन यांनी जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर शिवचरित्र हे प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. सूत्रसंचालन गीतांजली अंभोरे व शिवानी नळगे यांनी केले. यावेळी विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# शिवजयंतीनिमित्त जय शिवाजी जय भारत मेगा पदयात्रेत कमलताई जामकर महिला महाविद्यालयाचा सहभाग



**परभणी । प्रतिनिधी -** येथील जिल्हाधिकारी मा. रघूनाथजी गावडे यांच्या उपस्थितीत कै.सौ.कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी व स्वयंसेविकांनी जय शिवाजी जय भारत मेगापदयात्रेत उत्स्फ ुर्त सहभाग नोंदविला.

परभणी जिल्हा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने शासन निर्देशानुसार जय शिवाजी जय भारत मेगापद यात्रा आज दि. १९ फेब्रुवारी २०२५ बुधवार रोजी आयोजित करण्यात आली होती. मा. प्राचार्य डॉ. वसंत भोसले व उपप्राचार्य डॉ. संगीता आवचार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी पदयात्रेत उस्फूर्त सहभाग घेतला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय व शिवाजी महाराज पुतळास्थळी सकाळी ७:00 वाजता स्वयंसेवक व कार्यक्रम अधिकारी यांचे आगमन झाले. परभणी जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नियोजित पदयात्रा मार्गाद्वारे जय शिवाजी जय भारत मेगा पदयात्रेत जल्लोषात घोषणा देत ५१ रासेयो स्वयंसेविकांनी आपला सहभाग नोंदविला. सोबत मार्गदर्शक म्हणून रासेयो जिल्हा समन्वयक प्रा.अरुण पडघन व रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ.नसीम बेगम, प्रा.पी. डी. यादव व इतर प्राध्यापकवृंद उपस्थित होते. पदयात्रेत रासेयो स्वयंसेविका कु. अंजली देशमुख, संगीता जुमडे, हर्षदा शिंदे, साक्षी शिंदे, पुनम सुकरे, तरन्नुम, सालेहा, नाझिया, सुलताना,अलमास व बुशरा यांनी विषेश सहभाग नोंदविला. पदयात्रेचा सम ारोप मा.आशा गरुड, माध्यमिक जिल्हा परिषद शिक्षण अधिकारी यांच्यावतीने प्रोत्साहनपर भाषण करून व सामूहिक छायाचित्रिकरणाने झाला.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.